# संपादकीय

## प्रतीकाची सरशी नि सरशीचे प्रतीक

प्रतीकांच्या माध्यमातून खेळली जाणारी नव्या-जुन्याची, वर्तमान-इतिहासाची, वासाहतिक-उत्तर वासाहतिकाची आणि मूळ-उपऱ्याची अशी द्वंद्वाची लढाई भारतात कायम चालू असते. तशी ती कधी स्थिरावत नाही किंवा अंतिम निर्णयात्मकदेखील होत नाही, होऊ शकत नाही. ही लढाई सामाजिक, सांस्कृतिक चर्चाविश्वात नेहेमी चालू असते पण त्याला एक वेगळ्या प्रकारच्या संसदीय राजकारणाची झिलई आजकाल लाभते आहे. विरुद्ध मतांचे लोक प्रतीकांच्या लढाया सतत आणि प्रतीकांपुरत्याच खेळत आहेत. या लढायांना त्यामुळे निवडणुकांच्या राजकारणाचे महत्त्व प्राप्त झाले आहे.

हल्ली प्रतीके कशाचे तरी निव्वळ प्रतिनिधित्व करत नाहीत, अथवा निव्वळ मुद्दा ठसवत नाहीत तर त्यापुढे जाऊन ती जणू एक प्रकारचा विजय नोंदवतात. हा विजय प्रत्यक्षात जमिनीवर काहीही परिवर्तन न होताच जमाना बदलल्याचं निदर्शक म्हणून साजरा होतो. त्यामुळे वस्तू, चिन्ह, घोषणा, हातवारे या प्रकारांद्वारे जे एकमेकांना भिडण्याचं काम प्रतीके करतात त्याला बुद्धीचातुर्याची लढाई म्हणून पाहणे, तिचा आनंद घेणे शक्य होत नाही. हल्ली प्रतिकांचा खूप वेगवेगळ्या प्रकारे अन्वयार्थ लावणं शक्य झालं आहे. प्रतीकांमधून जाणवणारा उन्माद तसंच प्रतीके खोटंही बोलतात ही जाणीव अस्वस्थ करते. जशी संसदेच्या पायरीला हात लावून नमस्कार केल्याने उत्तरदायित्व निभावले जाईल याची कोणतीही खात्री नसते, तशी ब्रीफकेसच्या जागी चोपडी आणली म्हणजे हिशोब मिळेल, याचीही खात्री नसते. त्यापेक्षा पाया पडण्याने संसदेचं मंदिर होणं म्हणजे धर्माज्ञा बाहेर पडणार का अशी रास्त शंका घेता येऊ शकते, आणि पूर्वी चोपडीने केलेल्या शोषणाची आणि बंडखोर शेतकरी किंवा मजूरांनी जाळलेल्या चोपड्याची आठवण का काढू नये, हा प्रश्न अनुत्तरित राहतो. घराणेशाहीवर सातत्याने टीका म्हणजे घराणेशाही अस्वीकार्य आहे, असा अर्थ नसतो. एखादी महिला पहिल्यांदा वित्तमंत्री झाल्याने, त्यांनी 'नारी तू नारायणी' म्हणून गौरविल्याने बजेटमध्ये महिलांचा लिंगभावी विचार उमटेल, असं नसतं. उलटपक्षी त्यातून फक्त आर्यीकरणाच्या, रम्य भूतकाळाच्या जागराच्या दिशेनेच पुढे सरकता येतं.

हल्ली प्रतीकांमधून 'सगळीच नवीन सुरुवात होते आहे', असा आविर्भाव धारण केला जाऊ शकतो, पण कालानुरूप बदलांच्या ऐवजी कालातीत बदल घडवण्याचा अट्टाहास त्यात दडून असतो हा मोठाच विरोधाभास तयार झालेला आहे. अनेकदा प्रतीके फसतात, जुन्या अन्यायकारक आकलनाला गडद करतात. उदा. परिवर्तनाची आस दाखवणाऱ्या आर्टिकल १५ सारख्या सिनेमातून स्त्रीचं दलितत्व एका अर्थी अस्ताव्यस्त केसांमधून ठसवण्याचा प्रयत्न होतो (https://www.firstpost.com/entertainment/in-article-15-anubhav-sinha-continues-the-upper-caste-project-of-brahminising-anti-caste-struggles-6917121.html). तिथे विसंगती अशी, की बलात्काराचाही 'अभिनय' करून घेऊ शकणाऱ्या सिनेसृष्टीला तुंबलेलं गटार साफ करण्याच्या सीनमध्ये मात्र खरा दलित लागतो (https://scroll.in/reel/928925/anubhav-sinha-on-why-article-15-has-a-brahmin-hero-the-privileged-should-challenge-privilege). विविध संदर्भ जोडत प्रतीकांचंही राजकारण तयार झालेलं आहे आणि जन-समजूत तयार करण्यात त्याचा

मोठा वाटा आहे. महाभारतातले शंभर पुत्र क्लोन असण्याची (अ)वैज्ञानिक शक्यता एकदा लोकांसमोर मांडली, की रजनीकांतच्या रोबो सिनेमातले चिट्टीचे क्षणार्धात निर्माण होणारे असंख्य अवतार प्रेक्षकाला एकप्रकारे चटकन 'समजतात' आणि त्यापुढे जाऊन नंतर 'मैं भी अण्णा' मार्गे 'मैं भी चौकीदार' पर्यंतचा जन-समजेचा प्रवास विनासायास, खात्रीशीर होतो.

प्रतिकांना आपल्या चौकटीबाहेर जाऊन खऱ्या गोष्टींच्या जागेवर स्थानापन्न होण्याची ताकद मार्केटने दिली, जाहिरातींनी दिली. जाहिरातींनी संकल्पनांचे अर्थ बदलले : व्यवहारचातुर्य, शहाणपणा, लिंगसमानता, कणव, आरोग्य, प्रेम अशा संकल्पना किंवा भावना आता वस्तुरूपात येतात, आणि खरेदी-विक्रीचा आर्थिक व्यवहार झाला तरच सिद्ध होतात. हा मोठा बदल भारतीय जनतेनं जवळ जवळ पचवत आणलेला असल्यावर समाजकारण आणि राजकारणात जर प्रतीके खऱ्या व्यवस्थांना खो देतांना दिसू लागली तर नवल कसलं? सरकारांचं (पक्षाचं) शासन (व्यवस्था/नोकरशाही) झालं तर काय आश्चर्य? शेवटी 'शेटजी-भटजी' असं वर्णन घेऊन आलेलं हे सरकार आहे! खरी अडचण ही, की प्रतिकांनी चर्चाविश्वालाही आभासी बनवण्याचा घाट घातला आहे, कारण वाद-प्रतिवाद प्रतिकांमधेच अडकून पडत आहेत. ●

---

## अ ति थी  सं पा द की य

### अपारदर्शक अर्थसंकल्प

२०१९-२०२०चे राष्ट्रीय अंदाज पत्रक म्हणजे दुसऱ्या मोदी सरकारचे पहिले अंदाजपत्रक. आपण या अंदाजपत्रकापासून कोणत्या अपेक्षा करणे योग्य होते? खरे तर दर वर्षी अशा पद्धतीने शासनाने येत्या वर्षासाठीच्या आपल्या आर्थिक योजना व अंदाज मांडावेत, ही ब्रिटिश काळापासून चालू असलेली परंपरा आहे. ब्रिटिशांकडून आलेल्या सर्वच परंपरा वाईट नसतात. देशाची आर्थिक स्थिती काय आहे, देशाच्या आर्थिक व्यवहारात शासनाची कोणती भूमिका आहे, प्रमुख आर्थिक समस्या कोणत्या आहेत, हे लोक सभेसमोर आणि नागरिकांसमोर मांडण्याच्या या पद्धतीत एक लोकशाहीचे तत्त्व आणि पारदर्शकता असण्याची अपेक्षा आहे. अर्थात हे सरकार परंपरा मोडण्यात रस घेणारे सरकार आहे. मुख्य अंदाजपत्रकाच्या अगोदर रेल्वेचे अंदाजपत्रक मांडण्याची परंपरा पहिल्या मोदी सरकारने मोडली. आता २०१९-२०च्या अंदाजपत्रकामध्ये रेल्वेच्या खाजगीकरणाच्या दिशेने पहिले पाऊल उचलले गेले आहे. एका समीक्षकाने म्हटले आहे, की यापुढे देशाचे वार्षिक अंदाजपत्रक लोकसभेत मांडण्याची पद्धत बंद केली जाईल.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर आर्थिक नियोजनाची जी यंत्रणा उभी करण्यात आली, त्यात अर्थशास्त्रीय आकडेवारी गोळा करून तिचे विश्लेषण करण्यासाठी जागतिक कीर्तीच्या काही संस्था उभ्या करण्यात आल्या होत्या. बदलत्या जागतिक परिस्थितीत, आणि १९९२ नंतर आर्थिक धोरणांची चौकट बदलल्यानंतर सुद्धा, ती भारताच्या आर्थिक व्यवस्थापनासाठी मोठे योगदान देत राहिली. या यंत्रणेलादेखील मोदी सरकारने मोडकळीस आणले आहे. सध्या राष्ट्रीय उत्पन्नाचे (GDP), दरडोई राष्ट्रीय उत्पन्नाचे, किंवा राष्ट्रीय उत्पन्नाच्या वृद्धी दराचे आकडे पारदर्शकपणे लोकांसमोर आणले जात नाहीत. बेरोजगारीबद्दल आकडेवारी जाहीर न करण्याची घोषणा आधीच दिली गेली आहे. भारताला पुढच्या ५ वर्षात ५ हजार अब्ज डॉलरची अर्थव्यवस्था बनवायची आहे, ही घोषणा दिली गेली, मात्र वित्तमंत्र्यांच्या भाषणात या जुमल्याकडे कशी वाटचाल

करायची, याचा आराखडा दूरचीच गोष्ट दिशादिग्दर्शनही नाही. त्यामुळे ती आणखी एक घोषणा बनून राह्यली आणि पूर्वीच्या सरकारांनी काहीच केले नाही, फक्त समस्या निर्माण केल्या, हे सतत घोकण्याच्या भाजपच्या राजकारणाचा तो एक भाग झाला.

येत्या वर्षात राजकोषीय तूट ३.१%वर स्थिरावणार, असे अंदाजपत्रक आहे. मात्र वित्त मंत्री निर्मला सीतारामन यांनी आपल्या भाषणात राजकोषीय तुटीचा काहीच उल्लेख केला नाही. ही तूट आटोक्यात ठेवण्यासाठी शासनाचा महसूल वाढला पाहिजे पण प्रथम नोटाबंदी आणि पुढे जीएसटीची विस्कळीत अंमलबजावणी यामुळे यात फारसे यश आले नाही. आधीच्या बजेटमधील महसुलाची उद्दिष्ट्ये गाठली गेली नाहीत. खर्चाच्या बाजूकडे पाहिले तर शेतकरी कुटुंबांना वार्षिक रु. ६,००० देणाऱ्या प्रधान मंत्री किसान योजनेचा खर्चच रु. ७५,००० कोटी रुपये होणार आहे. 'द वायर' या इंग्रजी वेबसाईटने आज प्रसिद्ध केलेल्या एका लेखात तर असे म्हटले आहे, की अंदाजपत्रकाच्या कागदपत्रात दिलेली केंद्रीय शासनाच्या महसुलाचे व खर्चाचे आकडे शासनानेच काढलेल्या आर्थिक सर्वेक्षणाशी जुळत नाहीत. अर्थात, राजकोषीय तूट मर्यादेत ठेवण्यासाठी आणि आवश्यक वाटणारा खर्च कायम ठेवण्यासाठी पूर्वीच्या शासनांनी एक मार्ग धरला होता, तो म्हणजे, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे खाजगीकरण करणे. मोदी शासनही ते साधन वापरेलच. पण हे काही दीर्घकालीन आर्थिक प्रश्नांच्या सोडवणुकीचे माध्यम नाही.

वित्त मंत्र्यांनी अंदाजपत्रक मांडल्याच्या दुसऱ्याच दिवशी पंतप्रधान मोदी यांनी त्यांच्या शैलीत खुलासा दिला. भारतीय लोक हे ५ अब्ज डॉलर्सचे उद्दिष्ट गाठू शकणार नाही, असे म्हणणारे देशावर अविश्वास व्यक्त करत आहेत. (आलाच पुन्हा देशद्रोहाचा मुद्दा!) शेतीच्या विकासावर भर देणे, हा त्याच्यातील एक भाग राहील. आपण फक्त उत्पादन वाढवणार नाही, तर शेतमालाची निर्यातही वाढवणार. यासाठी सेंद्रिय शेतीवर भर दिली जाईल, जे पर्यावरणासाठी चांगले राहील आणि निर्यातही वाढवेल. कारण सेंद्रिय मालाला विदेशात मागणी आहे. यासाठी झिरो बजेट फार्मिंग हे गोंडस नाव दिले आहे : म्हणजे, विकतची रासायनिक आदाने न वापरता केलेली शेती. नंतर स्वच्छ भारत योजनादेखील उत्पादन वाढीसाठी महत्त्वाची आहे असे पंतप्रधान म्हणाले. दळणवळणाच्या सोयी विस्तारित करण्याचीही योजना आहे.

मग प्रश्न राहतो औद्योगिक उत्पादनाच्या वाढीचा. त्यासाठी मोठी गुंतवणूक करणे आवश्यक असते, ती कोण करणार? आतापर्यंत विदेशी औद्योगिक गुंतवणुकीचे प्रमाण फार वाढलेले नाही, परंतु मोदी सरकार या बाबतीत आशावादी आहे. औद्योगिक गुंतवणुकीचा प्रश्न बँकांशी जोडलेला आहे. सध्या कंपन्यांवरील कर्जाचे प्रमाण आणि बँकांकडील अनुत्पादित मत्ता (एनपीए) हे दोन्ही उच्च पातळीवर आहेत. यामुळे नवीन खाजगी गुंतवणुकीसंबंधी निराशाजनक वातावरण आहे. शासकीय आकडेवारीत बँकांचे अनुत्पादित कर्ज कमी करण्यात जेवढे यश मिळालेले दाखवले आहे, त्यापेक्षा विपरित परिस्थिती आहे; उरलेले प्रमाणदेखील खूप मोठे आहे.

इथे फक्त यंदाच्या अर्थसंकल्पात मांडलेली काही उद्दिष्टे, त्या मागची वस्तुस्थिती आणि शासकीय विधानांमधील अंतर्विरोध, यावर भाष्य केले आहे. मोदी शासनाच्या दीर्घकालीन आर्थिक धोरणांविषयी चर्चा केली नाही. पण यातील पारदर्शकतेचा अभाव आणि खोटी किंवा दिशाभूल करणारी माहिती पुरविण्याची प्रवृत्ती खरोखर चिंताजनक आहे. जगातील आर्थिक स्थिती फारशी सकारात्मक नसताना, पुढच्या वर्षात किंवा पाच वर्षात भारताची आर्थिक परिस्थिती सुधारेल, असे चित्र दिसत नाही. ●

**वंदना सोनाळकर**

ईमेल – wsonalkar@gmail.com